## जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


**प्रेसनोट क्र. २९८३ दि. १४/०९/२०१९**

### प्रेसनोट दि. १४/०९/२०१९

**पुणे शहरात सुरु असलेल्या गणेश उत्सवामध्ये गर्दीचा फायदा घेवुन मोबाईल चोरणाऱ्यास गुन्हे शाखा,युनिट-१, पुणे शहर यांनी केले जेरबंद..**

दिनांक ११/०९/२०१९ रोजी गुन्हे शाखा, युनिट-१, पुणे शहर यांचेकडील **पोलीस उप-निरीक्षक लहु सातपुते,** पो.हवा. प्रकाश लोखंडे, अशोक माने, पो.शि. गजानन सोनुने असे गणेश उत्सव निमित्ताने चैन चोरी, पॅकीट चोरी, मोबाईल चोरी गुन्ह्यांना प्रतिबंद करणेकामी युनिट-१ च्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, पो.शि. गजानन सोनुने यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सिंहगड रोड परिसरामधील समृध्दी लॉन्स येथे केटरींगचे काम करुन मोबाईल चोरणारा एक इसम हा बुधवार पेठ येथील क्रांती हॉटेल चौक पुणे येथे उभा असुन, त्याचेजवळ एक चोरीचा मोबाईल असल्याची खात्रीशीर बातमी प्राप्त झाल्याने सदर बातमीचा आशय आम्ही मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो, अरुण वायकर यांना कळविले असता, त्यांनी सदर बाबत योग्य ते मार्गदर्शन करुन कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिल्याने आम्ही वरील स्टाफच्या मदतीने सदर ठिकाणी जावुन बातमीप्रमाणे अचानक छापा घालुन एका इसमास ताब्यात घेतले, त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव विनोद बबन कासुर्डे वय ३३ वर्षे, रा.मु.पो.पिंपळगांव, ता.दौंड, जि.पुणे असे असल्याचे सांगितले त्याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यात एक काळया रंगाचा सॅमसंग कंपनीचा जे-७ प्राईम मोबाईल फोन अंदाजे किमंत ४,०००/- रु मिळुन आला त्यास सदर मोबाईल बाबत विश्वासात घेवुन विचारपुस केली असता, त्याने सदर चा मोबाईल फोन हा समृध्दी लॉन्स, नऱ्हे गाव, सिंहगड रोड, पुणे येथुन चोरी केल्याचे सांगितले असुन, सदर बाबत सिंहगड रोड पो.स्टे.गु.र.नं. ६०१/२०१९ भा.द.वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले असुन, त्यास ताब्यात घेवुन, त्याची वैदयकीय तपासणी करुन, गुन्हयाच्या पुढील तपासकामी सिंहगड रोड पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री बच्चन सिंह, यांचे मार्गदशनाखाली युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पोलीस उपनिरीक्षक लहु सातपुते, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत शिंदे, पोलीस कर्मचारी अरविंद चव्हाण, प्रकाश लोखंडे, अशोक माने, योगेश जगताप, गजानन सोनुने, सुधाकर माने, सुभाष पिंगळे, तुषार माळवदकर, सचिन जाधव यांनी केली आहे.